तहसील हिंगणा व जिल्हा नागपूर त्यांचे वारसांन म्हणून श्रीमती वच्छलाबाई नामदेव उमाटे, श्री दिलीप नामदेव उमाटे, श्री अरूण नामदेव उमाटे, श्री सुभाष नामदेव उमाटे, कु. सुनंदा नामदेव उमाटे उर्फ सौ. सुनंदा राजेश थोटे, कु. सुलोचना नामदेव उमाटे उर्फ सौ. सुलोचना सुभाष रोहनकर व कु. सुमन नामदेव उमाटे उर्फ सौ. सुमन राजेश जिवतोडे यांचे संयुक्त नावावर उपरोक्त शेतजमीन फेरफार क्रं. ९९, दि.२२/१२/१९९५ नुसार ७/१२ वर नामांतरित करण्यात आली.

ज्याअर्थी खसरा क्रं. ८९, मा. उपविभागीय अधिकारी नागपूर यांच्या आदेश क्रं. रा.मा.क्रं. १२९८/एलएनडी-१८/२००२-२००३, दि.१९/०७/२००३ नुसार सदर शेतजमीन भो. वर्ग २ मधुन भो. वर्ग १ मध्ये परिवर्तीत करण्यात आली आहे व तशी नोंद फेरफार क्रं. २५१, दि.२१/०७/२००३ नुसार ७/१२ वर घेण्यात आली आहे.

व ज्याअर्थी श्रीमती वच्छलाबाई नामदेव उमाटे, श्री दिलीप नामदेव उमाटे, श्री अरूण नामदेव उमाटे, श्री सुभाष नामदेव उमाटे, कु. सुनंदा नामदेव उमाटे उर्फ सौ. सुनंदा राजेश थोटे, कु. सुलोचना नामदेव उमाटे उर्फ सौ. सुलोचना सुभाष रोहनकर व कु. सुमन नामदेव उमाटे उर्फ सौ. सुमन राजेश जिवतोडे यांनी सदर खसरा क्रं. ८९, आराजी ४.१६ हे. आर. पैकी पुर्व पश्चिम विभागणी करून दक्षिणेकडील भाग आराजी १.३८६ हे. आर, मौजा सुकळी (गुपचुप) ही शेतजमीन दि.०३/०८/२००५ रोजी नोंदणीकृत विक्रीपत्र क्रं. हगन/४३१४/२००५ द्वारे श्री दिलीप बक्शोमल आसावाणी व श्री झामन गोधुमल गेहानी यांना विक्री करून दिला व सदर विक्रीपत्राचा दस्त अतिरिक्त बुक क्रं. १ वर मा. दु. नि. हिंगणा यांचे कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आला आहे व तशी नोंद फेरफार क्रं. २८६, दि.०३/०८/२००५ नुसार ७/१२ वर घेण्यात आली आहे व सदर शेतजमीनीस नविन खसरा क्रं. ८९/२ असे नविन नंबर देण्यात आला आहे व उर्वरित शेतजमीनीस खसरा क्रं. ८९/१, आराजी २.७७ हे. आर. मौजा सुकळी (गुपचुप) असे नविन नंबर देण्यात आले आहे.

व ज्याअर्थी श्रीमती वच्छलाबाई नामदेव उमाटे, श्री सुभाष नामदेव उमाटे, कु. सुनंदा नामदेव उमाटे उर्फ सौ. सुनंदा राजेश थोटे, कु. सुलोचना नामदेव उमाटे उर्फ सौ. सुलोचना सुभाष रोहनकर व कु. सुमन नामदेव उमाटे उर्फ सौ. सुमन राजेश जिवतोडे यांनी नोंदणीकृत मोबदला घेवून हक्क सोडण्याचा लेख क्रं. हगन/०६९८१/२००७, दि.१३/१२/२००७ रोजी सदरची शेतजमीन खसरा क्रं. ८९/१, आराजी २.७७ हे. आर., मौजा सुकळी (गुपचुप) यावरील आपला हक्क श्री दिलीप नामदेव उमाटे व श्री अरूण नामदेव उमाटे यांचे नावे करून दिले आहेत व त्यानुसार श्री दिलीप नामदेव उमाटे व श्री अरूण नामदेव उमाटे यांचे नावावर फेरफार क्रं. ६०३ नुसार ७/१२ वर नामांतरित करण्यात आली आहे.

हगन
८०८६/२०२१
५/२५

व त्याअर्थी श्री दिलीप नामदेव उमाटे व श्री अरूण नामदेव उमाटे यांनी कौटुंबिक वाटणीपत्राच्या दस्तानुसार कौटुंबिक आपसी वाटणी करून खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता उपरोक्त लिहून देणार श्री अरूण नामदेव उमाटे यांचे वाटेहिश्श्यात आल्यामुळे उपरोक्त लिहून देणार सदर मालमत्तेचे मालक झाले असून त्यांचा त्यावर ताबा असल्यामुळे खालील वर्णनाची शेतजमीन लिहून घेणार यांचे नावे या नोंदणीकृत विक्रीपत्राद्वारे, विक्री करण्याचा त्यांना संपूर्णपणे अधिकार प्राप्त झाला आहे.

मी वरील संमत्तीदार श्री दिलीप नामदेव उमाटे हे उपरोक्त शेतजमीनीचे संयुक्त वारसदार आहेत. परंतू ७/१२ उतारा–यावर त्यांचे नावे १.३८ हे. आर. इतकी शेतजमीन वेगळी ताबा हक्काने दाखविली आहे. उपरोक्त कौटुंबिक वाटणीमुळे सदर शेतजमीनीचा ताबा श्री दिलीप नामदेव उमाटे व श्री अरूण नामदेव उमाटे यांचे कडे वेगवेगळा आहे व त्यानुसार त्यांनी आपला मालकी हक्क त्यावर प्रस्थापित केला आहे. परंतू ७/१२ उता–यावर नाव असल्यामुळे मी श्री दिलीप नामदेव उमाटे, श्री अरूण नामदेव उमाटे यांचा भाऊ म्हणून विना मोबदला माझी सदर विक्रीस संमती असल्यामुळे व भविष्यात मी या बाबत कुठलाही हस्तक्षेप करणार नाही अथवा आक्षेप, हरकत अथवा कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करणार नसल्यामुळे मी या विक्रीस संमतीदार म्हणून, स्वेच्छेने कोणाचाही दबावात न येता संमतीदार म्हणून आपली स्वाक्षरी करीत आहे. यासाठी मी कुठलाही मोबदला घेतला नाही.

सदर शेतजमीन लिहून देणार यांना आर्थिक कारणास्तव विकायची असून वरील लिहुन घेणार हे बाजारभावाप्रमाणे योग्य किंमत देत असल्यामुळे मी लिहून देणार, लिहून घेणार यांना सदर शेतजमीनीची विक्री करून देत आहे. सदर स्थावर मालमत्ता ही मला वारसानात मिळाली असून उपरोक्त लिहून घेणार यांना विकण्याचा मला संपुर्ण अधिकार प्राप्त झाला आहे व त्यामुळेच मी हे विक्रीपत्र त्यांना नोंदणीकृत करून देत आहे.

वरील लिहुन देणार हेच सदर शेतजमीनीचे मालक असुन सदर शेतजमीनीवर पीक पाणी घेत आहे व त्यावर त्यांचाच ताबा असल्यामुळे या शेतजमीनीची विक्री करण्याचा त्यांना संपुर्ण अधिकार असल्यामुळे ते सदर जमीनीची विक्री लिहुन घेणार यांचे नावे करीत आहेत.

<u>कारणे खरेदीखत लिहून देतो तो येणेप्रमाणे:–</u>

<u>जमीनीचे वर्णन:–</u>

जमीनीचे वर्णन: – मौजा – सुकळी (गुपचुप), प. ह. न. ४५, खाता क्रं. ४२, तह. हिंगणा, जिल्हा – नागपूर येथील शेती (स्थावर मालमत्ता)

हगन
८०४६ / २०२१
६ / २८